I.O करीता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** पालघर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0207 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/08/2023 02:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 22/08/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/08/2023

**Time From (वेळेपासून):** 14:52 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 02:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/08/2023 **Time (वेळ):** 02:22 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/08/2023 02:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वित्त विभाग, जिल्हा परिषद ,पालघर कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दिगंबर कष्णा शेंडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1999

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपोपिंपळशेत,जव्हार ,जि पालघर ,पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपोपिंपळशेत,जव्हार ,जि पालघर ,पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश शवंत मौळे | | | 1. खंबाळा पोस्ट- साखरशेत,जव्हार ,पालघर ,पालघर,पालघर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 23/08/2023

मी दिगंबर कृष्णा शेंडे, वय 24 वर्ष, धंदा- लेबर कॉन्ट्रक्टर, रा.मु.पो.पिंपळशेत, ता.जव्हार जि. पालघर मो. 8766503577, आधार कार्ड क्रं 4123 1651 0950 समक्ष हजर राहुन तक्रार लिहून देतो की,

मी वरील प्रमाणे राहणेस असुन शेती व लेबर पुरविण्याचे काम करतो. त्यावर माझे कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो. माझे मित्र नामे जयनेश धनंजय खेडकर, मु.पो ता.जव्हार, जि. पालघर याचेकडे 15 वा वित्त आयोग योजनेतुन ग्रामपंचायत कासटवाडी पैकी रामनगर ता.जव्हार,जि.पालघर येथे नळ पाणी पुरवठा करणेबाबतचे कार्यादेश दिनांक 15/03/2022 रोजी ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचेकडुन मिळाले होते. मौजे रामनगर येथे पाईप लाईन टाकण्याचे, दगडी कठडा बांधुन त्यावर सिंटेक्स टाकी बसविण्याचे व इतर कामे होती. माझा मित्र जयनेश याचेकडे इतरही कंत्राटी कामे असल्याने व रामनगर येथील काम मुदतीत पुर्ण करावयाचे असल्याने जयनेश च्या विनंतीप्रमाणे सदर कामात त्यास मदत करणेकामी मजुर पुरविणे, कामाकरीता लागणारे साधन सामुग्री पुरविणे, कामावर देखरेख ठेवणे तसेच कामाची पुर्तता झालेनंतर झाले कामाचे खर्चाचे बिल मंजुरी करीता संबंधित विभागास पाठवुन त्याचा पाठपुरावा करणे इत्यादी कामे करण्यास सांगितली होते. त्या कामाचा जयनेश खेडकर यांचेकडुन त्याचे ईच्छेनुसार मला मोबदला मिळणार होता. जयनेश खेडकर याने केलेल्या कामाचे बिल मंजुरी करीता लागणारे कागदपत्रे व पाठपुरावा करण्याकरीता त्याने मला सांगितले होते. तसेच बिलासंबंधी पाठपुरावा करण्यासाठीचे अधिकार पत्रही जयनेश खेडकर याने दिनांक 14/08/2023 रोजी दिले होते.

मौजे रामनगर येथे पाईप लाईन टाकण्याचे, दगडी कठडा बांधुन त्यावर सिंटेक्स टाकी बसविण्याचे व इतर कामे मुदतीत पुर्ण करुन झाल्याने काम पुर्णत्वाचा दाखला ग्रामपंचायत कार्यालय, कासटवाडी ता.जव्हार जि.पालघर येथुन मिळाल्यानंतर सदर कामाचे बिल पंचायत समिती, जव्हार येथील पाणी पुरवठा विभागातील उप अभियंता यांचेकडुन मंजुर होवुन पुढील मंजुरीकरीता सदर कामाचे एकुण 2,49,856/- रुपयांचे बिल हे ग्रामिण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, पालघर कडील जिल्हा अभियंता यांचेकडे पाठविले असता ते त्यांनी पडताळणी करुन मंजुर केले व पुढील अंतिम मंजुरीकरीता वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचे कार्यालयात दिनांक 14/08/2023 रोजी प्राप्त झाल्याचे समजले. त्यानुसार मी दिनांक 18/08/2023 रोजी जिल्हा परिषद, पालघर कार्यालयातील वित्त विभागात कार्यरत असणारे व संबंधित काम पाहणारे सहायक लेखाधिकारी श्री.रमेश मौळे यांचेकडे मी मला जयनेश खेडकर यांनी दिलेले अधिकार पत्र दाखवुन मौजे रामनगर येथील केलेल्या कामाचे बिलासंदर्भात विचारणा केली असता सदर बिलाचे काम त्यांचेकडेच असल्याचे त्यांनी सांगुन अंतिम मंजुरी करुन देण्यासाठी 2,000/- रुपये लागतील असे सांगुन माझ्याकडे लाचेची मागणी केली. परंतू मला श्री. रमेश मौळे यांना लाचेची रक्कम दयावयाची ईच्छा नसल्याने मी श्री. शिरीष चौधरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेकडे दिनांक 21/08/2023 रोजी लेखी तक्रार दिलेली होती.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे पोलीस निरीक्षक श्री. शिरीष चौधरी यांनी लाचेच्या मागणीची पडताळणी करणेकामी दिनांक 22/08/2023 रोजी मला दांडेकर कॉलेज, पालघर चे रस्त्यालगत येण्यास सांगितले त्यावेळी उपस्थित दोन पंच साक्षीदार यांचेशी माझी ओळख करून देवून मी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. ती पंचांनी वाचुन झालेनंतर त्यावर पंचानी सहया केल्या आहेत. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिरीष चौधरी यांनी मला त्यांचे सोबत असलेल्या पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिरीष चौधरी यांनी मला तसेच आलेल्या दोन्ही पंचांना पडताळणीच्या अनुशंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यपध्दतीप्रमाणे पडताळणी पुर्व आवष्यक ती सर्व कार्यवाही पुर्ण करून घेतली. त्यानंतर माझे अंगावर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 यांचेसह मला श्री. रमेश मौळे, सहायक लेखाधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचे कार्यालयात कामाच्या अनुशंगाने



Scanned with CamScanner

बोलणी करण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे मी माझे ताब्यातील दुचाकी क्रं MH 48 AM 2339 यावर बसुन पंच नं. 01 यांचेसह जिल्हा परषद,पालघर येथील वित्त विभाग, कार्यालयात जावून श्री.रमेश मौळे, सहायक लेखाधिकारी यांचेशी मित्र जयनेश खेडकर यांनी केलेल्या कामाच्या बिलाचे अनुषंगाने बोलणी केली असता रमेश मौळे यांनी त्या कामाचे बिल दाखवुन सदर बिल मंजुरीकरीता तयार केले असल्याचे सांगुन रमेश मौळे यांनी 'करतो का ते' असे सांगुन उजवे हाताचा अंगठा बाजुच्या बोटांवर घासुन ईशा-याने पैशाची मागणी केली असता मी त्यांना 'किती' असे विचारता त्यांनी मला 'तेच ना ते छोट छोटं आहे ते करायचं आणि मोकळं व्हायचं' असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना 'तुमचे किती' असे सांगितल्यावर त्यांनी 'माझे फक्त शंभर रुपयाप्रमाणे' असे सांगितले. त्यानंतर पुन्हा काही वेळ बिला संदर्भात चर्चा केली असता श्री. मौळे यांना मी 'किती रुपये दयायला लागतील सांगा ना' असे विचारले असता त्यांनी 'दोन-तीन सांगत होते वित्त आयोगाचे' असे सांगितले त्यावर मी 'असं..दोन हजार रुपये होतात' असे प्रश्नार्थक विचारले असता त्यांनी 'हं..हं' असे सांगुन लाचेच्या मागणीस दुजोरा दिला. श्री. रमेश मौळे यांनी माझेकडे 2,000/- रुपये लाचेची मागणी केल्याने मी त्यांना 'मग मी एटीएमला जावुन येवु' असे विचारले असता श्री.रमेश मौळे यांनी 'काही अडचण नाय ना' असे विचारून पैसे घेवुन येणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच नं. 01 असे पुन्हा माझेकडील दुचाकीने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर पथकातील पोहवा/चव्हाण यांनी बंद केला. त्यानंतर मी दोन्ही पंचांसमक्ष घडलेली हकीगत पोलीस निरीक्षक श्री. शिरीष चौधरी यांना सांगीतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिरीष चौधरी यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, त्यामध्ये श्री. रमेश मौळे, सहायक लेखाधिकारी यांनी माझेकडे कामाच्या अनुषंगाने 2,000/- रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिरीष चौधरी यांनी मला तसेच दोन्ही पंचांना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती सांगून त्यापुर्वी सापळापुर्व कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून त्याबाबत थोडक्यात माहीती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिरीष चौधरी यांच्या सुचनेप्रमाणे मी 2,000/- रोख रक्कम त्यांचेकडे हजर केली. सदरच्या रक्कमेवर सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लाचेची रक्कम माझे नेसूस पॅन्टच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी हे आम्हास सर्वांना योग्य त्या सुचना देत असतांना एक चार चाकी वाहन येवुन थांबले. त्यातुन काही इसम बाहेर येताच पोलीस निरीक्षक श्री. शिरीष चौधरी यांनी सदर इसम हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी व कर्मचारी असल्याचे सांगुन पोलीस उप अधिक्षक श्री.दयानंद गावडे यांची व इतर कर्मचा-यांची ओळख करुन दिली. त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून लाचेच्या रक्कमेसह मला व पंच नं. 01 यांना श्री.रमेश मौळे यांची भेट घेण्यासाठी दुचाकीवर पाठविले. त्यावेळी सर्व सापळा पथक हे आमचे पाठोपाठ इतर चारचाकी वाहनाने जिल्हा परिषद पालघर, कार्यालयाचे आवारात येवुन कोणास संशय येणार नाही अशा पध्दतीने वावरत होते. त्यानंतर मी श्री. रमेश मौळे यांचे कार्यालयात त्यांचे टेबलजवळ जावुन माझे कामाच्या बिलांबाबत थोडा वेळ बोलणे केल्यानंतर मी माझेकडील लाचेची 2000/- रुपये रक्कम काढून ती श्री. रमेश मौळे यांचे समोर दाखवली असता ती त्यांनी त्यांचे डावे हाताने स्विकारुन, मोजुन घेवुन त्यांचे नेसुस पॅन्टचे डावे खिशात ठेवुन दिली. त्यानंतर श्री. रमेश मौळे यांनी माझेसोबत कार्यालयाचे दरवाज्याचे बाहेर आल्यानंतर मी लाचेचा स्विकार झाल्याचा पुर्व नियोजित इशारा सापळा पथकास केला असता त्यावेळी लागलीच सापळा पथकाने श्री. रमेश मौळे यांना ताब्यात घेतले आहे. तरी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाकडून दिनांक 22/08/2023 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान मौजे रामनगर येथे पाईप लाईन टाकण्याचे, दगडी कठडा बांधुन त्यावर सिंटेक्स टाकी बसविण्याचे व इतर कामे मुदतीत पुर्ण करुन सदर कामाचे बिल मंजूरीकरीता वित्त विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांचेकडे सादर केले असता श्री. रमेश मौळे, सहायक लेखाधिकारी यांनी सदरचे बिल मंजुरीकरीता माझेकडे 2,000/- रूपये लाचेची मागणी करून सदरची रक्कम दिनांक 22/08/2023 रोजी 14.52 वाजताचे सुमारास जिल्हा परिषद पालघर, वित्त विभाग कार्यालयात स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरूध्द तक्रार आहे.
सदरची तक्रार मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष
लिहून दिली. [signature]

पोलीस ठाणे अंमलदार
पालघर पोलीस ठाणे

हि फिर्याद
[signature]



Scanned with CamScanner

(शिरीश चौधरी)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि, पालघर

(दिगंबर कृष्णा शेंडे)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
kailas govind khade
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): hc1204
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पालघर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DATTATRAY BAJIRAC
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI



Scanned with CamScanner